शेतकरी जनता अपघात विमा योजनेंतर्गत राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोग, नवी दिल्ली येथे दाखल २२३२ प्रकरणांचे दाव्यांबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः शेअवि -२०१६/प्र.क्र.१५४/११-अे

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२
तारीख: १६ सप्टेंबर, २०१९

<u>वाचा -</u>

1. **कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.शेअवियो-२०१३/प्र.क्र.२९(२)/का.सां.९/१९२/२०१९, दि.२३.०७.२०१९.**
2. **शासन निर्णय,कृषि व पदुम विभाग क्र. शेअवि - २०१६/प्र.क्र.१५४/११-अे, दि.१८.११.२०१७**

<u>**प्रस्तावना :-**</u>

शेतकरी जनता अपघात विमा योजनेंतर्गत आयसीआयसीआय लोंबार्ड जनरल इंशुरन्स कंपनी लि. यांचे विरुध्द राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोग, नवी दिल्ली येथे दाखल २२३२ प्रकरणांचे दाव्याबाबत ॲड. संजीव सिंग यांची संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र शासनाच्या वतीने बाजू मांडण्यास नियुक्ती करण्यात आली आहे.

त्यानुसार ॲड. संजीव सिंग यांनी महाराष्ट्र शासनाच्या वतीने राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोग, नवी दिल्ली येथे दि. ३०.१०.२०१८ व दि. १२.९.२०१९ रोजी बाजू मांडण्यासाठीची संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये एकूण रु.६६,०००/- इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्याबाबत कृषि आयुक्तालयाने विनंती केली आहे. त्यानुषंगाने उपरोक्त प्रयोजनार्थ रु.६६,०००/- इतकी रक्कम बी.डी.एस प्रणालीवर वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय : -

शेतकरी जनता अपघात विमा योजनेंतर्गत आयसीआयसीआय लोंबार्ड जनरल इंशुरन्स कंपनी लि. यांचे विरुध्द राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोग, नवी दिल्ली येथे दाखल २२३२ प्रकरणांचे दाव्याबाबत ॲड. संजीव सिंग यांनी दाव्यात महाराष्ट्र शासनाच्या वतीने राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोग, नवी दिल्ली येथे बाजू मांडली. यासंदर्भात ॲड. संजीव सिंग यांनी सादर केलेल्या देयकानुसार प्रति सुनावणी उपस्थित राहण्यासाठी रु.३३,०००/- याप्रमाणे केलेल्या फीच्या मागणीस मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच याप्रकरणी झालेल्या दि.३०.१०.२०१८ सुनावणीसाठी व दि. १२.०९.२०१९ रोजीच्या सुनावणीकरिता एकूण रु. ६६,०००/- इतकी रक्कम

खालील लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध निधीतून वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

मागणी क्र. डी - ३
२४०१ पीक संवर्धन
११०-पीक विमा राज्य योजनांतर्गत योजना
(००) (०६) गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना
(२४०१ ४४२७) राज्य योजना - ३३ अर्थसहाय्य

२. प्रस्तुत प्रयोजनार्थ सहाय्यक संचालक (लेखा - १) यांना आहरण व संवितरण अधिकारी तर संचालक, (विस्तार व प्रशिक्षण) यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे

प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१६१६२०११७५०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Neeta Eknath Shinde

Digitally signed by Neeta Eknath Shinde
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Agriculture and ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f2bffd6992498e56663024368c72b33364cfb066d53682c53a425e54d187a7c1, serialNumber=f325d659f47933958aa2d98f394db95f94be57548776492ba36e77ea1c4aa53b, cn=Neeta Eknath Shinde
Date: 2019.09.16 16:31:35 +05'30'

(निता शिंदे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)
२. कृषि संचालक (वि.प्र.), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
३. मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
४. सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
५. सहाय्यक संचालक (अर्थसंकल्प), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
६. महालेखापाल, (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
७. संचालक, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
८. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
९. वित्त विभाग (व्यय-१) / (अर्थसंकल्प-१३) / (अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१०. नियोजन विभाग (कार्यासन-१४३१), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
११. प्रधान सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१२. सहसचिव (११-अे) यांचे स्वीय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१३. कक्ष अधिकारी (२-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३
१४. निवड नस्ती, का.११-अे.